संच : अ

# ८ वी मराठी

**महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे ३०.**
**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र**
**शैक्षणिक प्रगती चाचणी**
**पायाभूत चाचणी २०१७-१८ : इयत्ता - आठवी**
**विषय : मराठी (लेखी)**

**विद्यार्थ्याचे नाव :** ______________________

**शाळेचे नाव :** ______________________ **दिनांक :** / /२०१७

**केंद्र :** __________ **ता.** __________ **जि.** __________ **प्राप्त गुण :** [ ]

**हजेरी क्रमांक :** [ ] **तुकडी :** ____ **शिक्षकाची स्वाक्षरी** ________ **एकूण गुण :** [ ५० ]

**प्रश्न १.** शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) ______________ २) ______________

३) ______________ ४) ______________

५) ______________ ६) ______________

७) ______________ ८) ______________

९) ______________ १०) ______________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-III\19-06-17\GJ*

## संच : अ

**प्रश्न २ ते ४ साठी :** हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

वडिलांच्या धंद्यात अचानक चक्रीवादळ आलं. तेव्हा मोठा भाऊ आणि मी, दोघंही वडिलांना धंद्यात मदत करायला लागलो. घरी वडिलांच्या समोर उभं राहायला घाबरणारी आम्ही मुलं, आता त्यांच्या हाताखाली काम करायला लागलो. आदर्श रेस्टॉरंट कसं चालवावं, याचे प्राथमिक धडे मला त्यांच्याकडूनच मिळाले.

हॉटेलवाल्याला अनेक भाषा आल्या पाहिजेत. ते मराठी, हिंदी, गुजराती, इंग्रजी सगळ्या भाषा शिकले. कूकच्या सर्व खुब्या कूकचं कसब त्यांनी शिकून घेतलं.

त्यांच्यातील आणखी एक विलक्षण माणुसकीची गोष्ट म्हणजे हॉटेलच्या नोकरमाणसांवरचं त्यांचं प्रेम. ते स्वत: कधी काळी हॉटेलमधील नोकर होते, त्यामुळे स्वत:च्या हॉटेलमधल्या नोकरांची ते खूप काळजी घेत. त्यांच्याशी आपुलकीने वागत.

वडिलांना साठ वर्षे झाली, तेव्हा त्यांनी हॉटेलच्या सर्व स्टाफला पैसे, स्टीलची भांडी, प्रत्येकाच्या बायकोला साडी आणि प्रत्येक स्टाफमेंबरला सफारी सूट दिला.

**प्रश्न २.** आदर्श रेस्टॉरंट कसे चालवावे याचे प्राथमिक धडे लेखकाला कोणाकडून मिळाले? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) भावाकडून ब) वडिलांकडून क) कूककडून

**प्रश्न ३.** लेखकाच्या वडिलांचे हॉटेलच्या नोकरमाणसांवरील प्रेम कशावरून समजते, ते लिही. (गुण २)

___

___

**प्रश्न ४.** आदर्श रेस्टारंट चालविण्यासाठी लेखक कोणकोणत्या गोष्टी शिकले? (गुण २)

___

___



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-III\19-06-17\GJ*

## संच : अ

**प्रश्न ५ ते ७ साठी** : हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

सचिन तेंडुलकर हे आपल्या देशातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व! असंख्य विक्रम करणाऱ्या, अवघ्या चाळिसाव्या वर्षी 'भारतरत्न' हा सन्मान मिळवणाऱ्या सचिनचा आदर्श ठेवावा, असे कुणाला वाटणार नाही? पण स्वत: सचिनपुढे कोणता आदर्श होता? सचिनने पदार्पणातच क्रिकेटमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर घवघवीत यश मिळवले, तेव्हा लेखक असलेल्या त्याच्या वडिलांनी रमेश तेंडुलकर यांनी सचिनला म्हटले होते, ''क्रिकेट खेळून तू यश मिळवतो आहेस, हे आनंदाचंच आहे, पण विचार कर, किती वर्षे क्रिकेट खेळशील? पंधरा वर्षे, जास्तीत जास्त वीस वर्षे आणि माणूस म्हणून जगशील अंदाजे सत्तर वर्षे. याचा अर्थ क्रिकेट खेळणं, हा जीवनातला एक छोटा काळ आहे, तेव्हा यशानं माजू नकोस आणि अपयशानं खचू नकोस. माणूस म्हणून चांगला वाग, स्वभाव चांगला ठेव. लोकांनी अखेर तुला चांगल्या स्वभावाचा माणूस म्हणून लक्षात ठेवलं, तर ते जास्त मोलाचं आहे.''

सचिनने वडिलांनी दिलेला हा मंत्र मनाशी जपला, म्हणूनच तो नुसता खेळाडू नव्हे, तर चांगला माणूस म्हणून नावाजला गेला. अफाट लोकप्रियता मिळूनही तो कायम नम्रच राहिला. पंचांचा निर्णय चुकला, तरी मैदानावर त्याने कधी बॅट आपटली नाही. त्याच्यावर टीका करणाऱ्यांनाही त्याने आपल्या बॅटनेच उत्तर दिले. स्वत:च्या विक्रमांपेक्षा नेहमी संघाच्या विजयाला महत्त्वाचे मानले. आपले गुरू, सहकारी, कुटुंबीय यांच्याविषयी तो कायम कृतज्ञ राहिला. मोठे होताना हे सारे विसरू नका.

**प्रश्न ५.** सचिनला चाळिसाव्या वर्षी कोणता सन्मान मिळाला? (गुण १)

**प्रश्न ६.** वडिलांनी सचिनला वागणुकीबाबत कोणता सल्ला दिला? (गुण २)

**प्रश्न ७.** सचिनने आपल्या खेळाच्या कारकिर्दीमध्ये कोणत्या गोष्टीला महत्त्व दिले? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण २)

अ) स्वत:चा विक्रम ब) संघाचा विजय क) शतक करणे.



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-III\19-06-17\GJ

## संच : अ

**प्रश्न ८ ते १० साठी** : ही कविता वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

हिरवी झाडी, पिवळा डोंगर,
निळी सावळी दरी,
बेट बांबुचे त्यातुन वाजे
वाऱ्याची पावरी.

कभिन्न काळ्या खडकांमधुनी
फुटति दुधाचे झरे,
संथपणाने गिरक्या घेती
शुभ्र शुभ्र पाखरे!

सोनावळिच्या सोनफुलांचा
बाजुस ताफा उभा,
तलम धुक्याची निळसर मखमल
उडते, भिडते नभा.

(शांता शेळके)

**प्रश्न ८.** कवितेतील वर्णनावरून कोणत्या ऋतूचे केले आहे असे तुला वाटते. (गुण १)
ते खालील पर्यायातून निवड आणि योग्य पर्यायाला गोल कर.

अ) उन्हाळा ब) पावसाळा क) हिवाळा

**प्रश्न ९.** कभिन्न काळ्या खडकांमधुनी फुटति दुधाचे झरे, (गुण २)
या ओळींचा अर्थ तुझ्या शब्दात लिही.

______________________________

______________________________

**प्रश्न १०.** कवयित्रीने निळसर मखमल कशास म्हटले आहे ते लिही. (गुण २)

______________________________

______________________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-III\19-06-17\GJ

## संच : अ

**प्रश्न ११ ते १३ साठी** : हा लेख वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

परीक्षा संपली आणि सुट्टी सुरू झाली. मनावरचा बराचसा ताण हलका झाल्यासारखे वाटत असेल ना? वर्षभराच्या शाळा, क्लास, अभ्यास या घट्ट दिनक्रमातून काही दिवस का असेना, पण सुटका झाली अशीच तुमची भावना झाली असेल? पण खरं सांगायचं तर खऱ्या विद्यार्थ्याला कधीच सुट्टी नसते. सुट्टी ही त्याच्यासाठी नवं काहीतरी शिकण्याची संधी असते. तुम्ही म्हणाल, वर्षभर आम्ही शाळेत शिकतच असतो ना? पण मित्रांनो, पुस्तकाच्या बाहेर एक मोठ्ठ जग आहे, त्यात शिकण्यासारख्या हजारो गोष्टी आहेत. मनाचे दरवाजे खुले ठेवून सभोवारच्या निसर्गाकडे पहा. ज्ञानाचा प्रकाश कुठून येईल, सांगता येत नाही.

सुट्टीमध्ये करण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. मन आणि मेंदूवरील ताण हलका करण्यासाठी सुट्टीचा सुयोग्य वापर करता येतो. आवडत्या छंदाकडे वळता येते, कारण छंद आपल्याला आयुष्यावर प्रेम करायला शिकवतात. आपला वेळ आपल्याला आनंद देणाऱ्या गोष्टी करण्यात, शिकण्यात घालवा. लेखन, कविता, चित्र, प्रवास, खेळ, वाचन, समाजोपयोगी काम, नवनवीन वस्तू तयार करणे, आसपासच्या रम्य स्थळांना भेटी देणे इत्यादी कितीतरी गोष्टी आपण करू शकतो, पण एक गोष्ट लक्षात ठेवा, जे कराल ते निखळ आनंदासाठी करा. परीक्षेत किती गुण मिळतील? अपयश तर येणार नाही? अमुक मुलापेक्षा मी मागे तर पडणार नाही ना? शिक्षक काय म्हणतील? आईबाबांना काय वाटेल? अशा नानाविध शंकांना मनातून आधी काढून टाका, कारण गोंधळलेले आणि अपेक्षांच्या ओझ्याने वाकलेले मन जीवनाचा निर्भेळ आनंद घेऊ शकत नाही, तसेच ज्ञानप्राप्तीही करू शकत नाही. मन शांत ठेवा, चिंता आणि स्पर्धा सोडा, मग बघा तुमच्यातील अनेकानेक सुप्तगुण बाहेर येतील. जुन्या गोष्टींचे नवे अर्थ उमगू लागतील, नवनवे मार्ग सापडतील, तुमचे मन चैतन्याने भरून जाईल, कारण सर्जनातला आनंद कल्पनेपलीकडचा असतो. ही सुट्टी हा आनंद शोधण्याची संधी आहे. असे मानून पुढे चला!

(किरण केंद्रे – कार्यकारी संपादक)

**प्रश्न ११.** संपादकाच्या मते सुट्टी कशाकरिता असते? (गुण १)

______________________

**प्रश्न १२.** सुट्टीमध्ये करण्यासारख्या कोणकोणत्या गोष्टी आहेत? (गुण २)

______________________

______________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-III\19-06-17\GJ*

## संच : अ

**प्रश्न १३.** आपल्यामधील सुप्त गुण केव्हा बाहेर येतील? (गुण २)

---

---

---

**खालील प्रश्न दिलेल्या सूचनेनुसार सोडव.**

**प्रश्न १४.** 'स्वल्प' या शब्दाचा संधिविग्रह खालीलपैकी कोणता? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) स्व + अल्प    ब) स्व + ल्प    क) सु + अल्प

**प्रश्न १५.** पुढील शब्दाचा संधी कर. (गुण १)

धारा + उष्ण = ____________________

**प्रश्न १६.** खालील वाक्यात अधोरेखित केलेल्या शब्दांऐवजी कंसात दिलेल्या पर्यायांमधून योग्य वाक्प्रचार निवड आणि आवश्यक बदल करून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

(कान टवकारणे, कानावर हात ठेवणे, कान फुंकणे)

वर्गात शेंगाची टरफले कोणी टाकली? असे विचारताच सर्वांनी नकार दिला.

---

**प्रश्न १७.** खालील शब्दांचा आकारविल्हे क्रम लाव. (वर्णानुक्रम लाव.) (गुण १)

उमेश, मेरी, अहमद, अरुणा

---



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-III\19-06-17\GJ*

## संच : अ

**प्रश्न १८.** खालील वाक्यातील चुकीचे विरामचिन्ह शोध, त्या जागी योग्य विरामचिन्ह वापरून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

''माधवकाका, 'संबंध' शब्दाचा अर्थ काय हो!'' रमेश म्हणाला.

______________________________

**प्रश्न १९.** खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे सामान्यरूप ओळखून लिही. (गुण १)

जॉनला <u>कोकिळेचे</u> कुहूकुहू ऐकायला आवडते.

______________________________

**प्रश्न २०.** खालील वाक्यातील क्रियाविशेषण अव्यय ओळख व त्या प्रकारचे क्रियाविशेषण अव्यय वापरून दुसरे वाक्य लिही. (गुण २)

बाबांनी ताईला दोनदा हाक मारली.

क्रियाविशेषण : ______________________________

वाक्य : ______________________________

**प्रश्न २१.** अधोरेखित शब्दाला योग्य विभक्ती प्रत्यय लावून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

<u>आई</u> मला भाजी वाढली

______________________________

**प्रश्न २२.** खालील प्रसंग वाच व त्याला कंसातील म्हणींपैकी योग्य अर्थाची म्हण निवडून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

(खाई त्याला खवखवे, घरोघरी मातीच्या चुली, इकडे आड तिकडे विहीर)

घरी आई आजारी आणि शाळेत परीक्षा चालू होती. म्हणतात ना ______________

______________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-III\19-06-17\GJ*

**संच : अ**

**प्रश्न २३.** तुझ्या शाळेत साजरा करण्यात आलेल्या स्वातंत्र्यदिनाचा अहवाल लिही. (गुण ५)



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-III\19-06-17\GJ*

## संच : अ

**प्रश्न २४.** खाली एक घटना दिली आहे. त्यावर तुझे मत व्यक्त कर. (गुण ५)

गाडी चालवताना शेजारच्या काकांना अपघात झाला. त्यावेळी त्याने हेल्मेट न घातल्याने डोक्याला इजा झाली. त्यांना डॉक्टरांकडे नेण्यात आले. मलमपट्टी करून घरी सोडण्यात आले, परंतु बरे होण्यास अनेक दिवस लागले. या प्रसंगाबाबत तुझे मत काय आहे? ते लिही.



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-III\19-06-17\GJ

**संच : अ**

**प्रश्न २५.** तुझ्या आवडत्या खेळाडूने तुझ्या क्रिकेटच्या संघाला मार्गदर्शन करण्यासाठी यावे म्हणून पत्र लिही. (गुण ५)

■■■



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-III\19-06-17\GJ*